



बातमी जि लपवली नाही दाखवली जाते !

दैनिक

# प्रजाशाहीचा आवाज

मुख्य संपादक : वैभव धबडगे






प्रजाशाहीचा आवाज NEWS
Voice Of Democracy
बातमी जी लपवली नाही नाही तर दाखवली जाते
Contact 9822474807 8766498503 9552383692
www.prajashahichaawaj.in

बुधवार १७ डिसेंबर २०२५ | RNI-MAHMAR/2024/89502 | Email : prajashahichaawaj@gmail.com | वर्ष : ०२ | किंमत २ रुपये | 9822474807


## 29 महापालिकांसाठी निवडणुका जाहीर, मतदान आणि निकाल कधी?

### राज्यातील 29 महापालिकांसाठी एकूण 3 कोटी 48 लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मुंबईमध्ये एक सदस्यीय तर इतर 28 ठिकाणी बहुसदस्यीय वॉर्ड असणार आहेत.

मुंबई-ठाण्यासह राज्यातील प्रलंबित 29 महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या महापालिकांसाठी 15 जानेवारी रोजी मतदान होणार असून त्याचा निकाल 16 जानेवारी रोजी लागणार आहे. त्यासाठी आजपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. राज्यातील 29 महापालिकांसाठी 3 कोटी 48 लाख मतदार मतदान करणार आहेत.ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुका या गेल्या पाच ते सात वर्षांपासून किंवा त्या पेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. त्यामध्ये सुरुवातीला 2 डिसेंबर रोजी नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुका घेण्यात आल्या. आता त्यानंतर राज्यातील प्रलंबित 29 महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.


------------------------------

नामनिर्देशन पत्र स्वीकारणे -
23 डिसेंबर ते 30 डिसेंबर अर्जाची छाननी -
31 डिसेंबर उमेदवारी माघारीची मुदत -
2 जानेवारीचिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी -
3 जानेवारीमतदान -
15 जानेवारी निकाल -
16 जानेवारी राज्यातील 27 महापालिकांची मुदत संपली आहे.

त्यासोबत जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या महापालिका निवडणुकांसाठी 1 जुलै 2025 रोजीची मतदान यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आली असल्याने त्यामध्ये नावे वगळण्याचे अधिकार राज्य आयोगाला नाहीत असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

एकूण मतदार - 3.48 कोटी एकूण मतदार केंद्र - 39,147 मुंबईसाठी मतदार केंद्र - 10,111कंट्रोल यूनिट - 11,349 बॅलेट यूनिट - 22,000 निवडणूक खर्चाची मर्यादामहापालिका




निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा निवडणूक आयोगाने आखून दिली आहे. त्यामध्ये मुंबईसह अ वर्ग महापालिकांसाठी एका उमेदवाराला 15 लाख रुपये खर्च करण्याची मुभा आहे.
अ वर्ग - 15 लाखब वर्ग - 13 लाखक वर्ग - 11 लाखड वर्ग - 9 लाखमुंबई महापालिकेमध्ये एक सदस्यीय वॉर्ड असल्यामुळे मतदारांना एकच मत द्यावं लागणार आहे. तर उर्वरित 28 महापालिकांसाठी एक ते पाच सदस्यीय वॉर्ड असल्याने त्यानुसार मतदान द्यावं लागणार आहे.महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज फक्त ऑफलाईन पद्धतीने करता येणार आहे. तसेच ज्या उमेदवारांकडे सध्या जात वैधता प्रमाणपत्र नाही त्यांना निवडणुकीपासून सहा महिन्यांच्या आत सादर करावं लागणार आहे.मतदार जनजागृतीसाठी रील तयार करण्यात आले आहेत. जेष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी मतदार केंद्रावर आवश्यक त्या सुविधा असतील. मतदान केंद्रावर रँप आणि व्हील चेअर असतील.राज्यातील 1,96, 605 कर्मचारी या निवडणुकीसाठी काम करतील. मतदानाच्या आधी 48 तास प्रचारावर बंदी असेल. तसेच त्या दरम्यान जाहिरातींवरही बंदी असेल. महापालिका निवडणूक नियमांनुसार ही बंदी असेल.राज्यातील 29 महापालिकांसाठी एकूण 2,869 जागांसाठी मतदान होणार आहे. त्यामध्ये 1,442 महिला सदस्य, 759 इतर मागासवर्गीय सदस्य, 341 अनुसूचित जाती तर 77 सदस्य हे अनुसूचित जमातीचे सदस्य असतील.दुबार मतदारांच्या नावासमोर स्टार चिन्हमुंबईत 11 लाख संभाव्य दुबार मतदार आहेत. एकूण मतदारांचा विचार करता ती सात टक्के इतकी असल्याचं समोर आलं आहे. या दुबार मतदारांची ओळख केली असून त्यांच्या नावासमोर दोन स्टार असतील. त्यांच्या घरी जाऊन सर्वेक्षण केलं आहे आणि मतदान कुठे करणार हे त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात आले आहे. ज्यांचा सर्व्हे झाला नाही त्यांच्याकडून मतदान केंद्रावर हमीपत्र घेतल जाईल.कोणत्या महापालिकांमध्ये निवडणूक होणार?1. बृहन्मुंबई - 2272. भिवंडी-निजामपूर - 903. नागपूर – 1514. पुणे – 1625. ठाणे - 1316. अहमदनगर - 687. नाशिक – 1228. पिंपरी-चिंचवड - 1289. औरंगाबाद - 11310. वसई-विरार - 11511. कल्याण-डोंबिवली - 12212. नवी मुंबई - 11113. अकोला - 8014. अमरावती - 8715. लातूर - 7016. नांदेड-वाघाळा - 8117. मीरा-भाईंदर - 9618. उल्हासनगर - 7819. चंद्रपूर - 6620. धुळे - 7421. जळगाव - 7522. मालेगाव - 8423. कोल्हापूर - 9224. सांगली-मिरज-कुपवाड - 7825. सोलापूर - 11326. इचलकरंजी – 7627. जालना - 6528. पनवेल - 7829. परभणी – 65

---

## शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे कॉलेज मध्ये कवी संमेलन संपन्न

जे न देखे रवी ते देखे कवी कविता ही संकल्पना आहे तशी छान कविता ही एखाद्या प्रसंग मार्मिकपणे अगदी कमी वेळेत सांगू शकतो कविता हे समाजप्रबोधनाचे एक उत्कृष्ट माध्यम आहे यासाठी विद्यार्थ्यांना याविषयी व्यासपीठ मिळून तसेच विद्यार्थ्यांना कविते विषयी अधिक माहिती मिळावी यासाठी ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स - आवरे येथे कोकण मराठी साहित्य परिषद आयोजित कवी संमेलन मोठया उत्साहात संपन्न झाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे कॉलेजचे प्राचार्य सुविद्य गावंड यांनी केले. कवी संमेलनात माजी प्राचार्य आर.के.म्हात्रे यांनी शिक्षण आणि आपली




ध्येये या विषयावर मार्गदर्शन केले. जीवन सुखी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी आपल्या समोर ध्येय ठेवायला हवीत, असे विचार मांडले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील होते. येथे झालेल्या कोमसापच्या कविसंमेलनात कवयित्री अक्षता गोसावी यांनी कोलाहल मनातला कविता सादर करून सर्वांची मने जिकली. श्री. लवेंद्र मोकल यांनी दारूबंदी, श्री. संजीव पाटील यांनी आगरी पित्रा, श्री.रामचंद्र म्हात्रे यांनी जय जय उरण माझा या कविता सादर केल्या . तसेच प्रेमकाव्य ,निसर्गकाव्य, भावकाव्य ,विडंबनकाव्य इत्यादी प्रकारच्या कविता उत्स्पूर्त सादर केल्या या काव्य सादरीकरणाची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी शीघ्र कविता सादर केल्या. कार्यक्रमात श्री.केशव म्हात्रे, श्री.संजय केणी, प्रा.प्रविण चिर्लेकर, श्री.शिवप्रताप पंडित, श्री.नरेश पाटील,,सौ. रंजना केणी आणि साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील यांनी दर्जेदार कविता सादर करून रसिकांना मनसोक्त आनंद दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.रंजना जोशी केणी आणि प्रा.प्रविण चिर्लेकर यांनी केले. कवी संमेलन यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन प्रा.रोहिणी गोरे यांनी केले.


बहुजन हिताय...!







बहुजन सुखाय...!

बौद्धमय भारत निर्माण अभियान अंतर्गत

**एकदिवसीय धम्म प्रबोधन प्रशिक्षण शिबीर**

तथागत सम्यक संमबुद्ध यांनी आपल्या भिक्खु संघांस बहुजन हिताय बहुजन सुखायसाठी चरत भिक्खवे चारिकं हा आदेश दिला, मानवी जनकल्याणासाठी सुशिक्षित आणि प्रशिक्षित भिक्खु संघाची गरज आहे, असे प्रतिपादन केले होते. त्याच धर्तीवर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बौद्ध धम्मक्रांती आणि बौद्धमय भारत निर्मातीसाठी आज आम्ही प्रशिक्षित बौद्ध उपासक असणे गरजेचे आहे, असे म्हटले आहे. त्याकरिता एकदिवशीय बौद्ध धम्म प्रबोधन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, करिता या शिबिरामध्ये आपण उपस्थित राहावे हि विनंती.

विषय: १) बुद्ध धम्म निर्मिती इतिहास आणि तत्कालीन समाजाचा राजकीय आणि आर्थिक जीवनावरील बदल.
२) बुद्ध धम्म आणि संघ या तीन रत्नांची तथागत बुद्ध यांच्या दृष्टिकोनातून भूमिका काय? त्यानंतर देशात घडलेली क्रांती आणि प्रतिक्रांती.
३) आजच्या वर्तमान काळात प्रशिक्षण बौद्ध धम्म प्रचारक संघाची का गरज आहे.

● अध्यक्ष ●
पुज्य भदन्त डॉ. नागघोष महाथेरो
( अध्यक्ष– महाबोधी बहुउद्देशीय संस्था, वटफळी वटफळा)

● उद्धघाटक ●
प्रोफेसर डॉ. वृषालीताई रणधीर
( Principal - Ness Wadia College of Commerce, Pune )

● प्रमुख पाहुणे ●
मा.सर्जेराव वाघमारे (अध्यक्ष– कोरेगांव भीमा विजय रणस्तंभ सेवा संघ.)
मा. समाजभूषण सुधाकर अभंग (युवा प्रबोधनकार)

● प्रमुख उपस्थिती ●
मा. अनिल गायकवाड (अध्यक्ष– सम्राट अशोक बुद्ध विहार, केसनंद)
मा. प्रकाश मेश्राम (अध्यक्ष– तथागत मैत्री संघ)
मा. विकास (बाप्पू) कांबळे (अध्यक्ष–ज्ञानप्रसारक बहुदेशीय सामाजिक संस्था, शिवशंभो नगर, केसनंद )
मा. भुषण शिंदे (अध्यक्ष–भिम संघ तरुण मंडळ)

● प्रशिक्षक ●
मा. वैभव एस. धबडगे (युवा प्रबोधनकार)

● रविवार, दि. ४ जाने २०२६, सकाळी ११ वा. उद्धघाटन ●
सकाळी ११:३० ते २:०० प्रशिक्षण, दुपारी २:०० ते २:३० अल्पोहार
दुपारी २:३० ते ४:०० प्रशिक्षण, सायं. ४:०० ते ५:०० चर्चासत्र, चर्चा संवाद , चहा पाणी .

● आयोजक ●
भंन्ते सचितबोधी बोधिवन बुद्ध विहार ९३५९२४२३८२
स्थळ : बोधीवन बुद्ध विहार वाडेगाव वाडेबोल्हाई पुणे

# धामणगाव येथे “गोष्टरंग” बालनाट्य व पालक उद्बोधन कार्यक्रम उत्साहात संपन्न

धामणगाव (वार्ताहर) : शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या क्वेस्ट (QUEST) या सेवाभावी संस्थेतर्फे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धामणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने “गोष्टरंग” बालनाट्य व पालक उद्बोधन कार्यक्रम काल संध्याकाळी शिवतीर्थासमोर मोठ्या उत्साहात पार पडला. थंडीची परवा न करता पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात क्वेस्ट (QUEST) संस्थेच्या कलाकारांनी सादर केलेली “पाचखांबी गाव” आणि “भुतावळ” ही दोन सामाजिक संदेशांनी परिपूर्ण बालनाट्ये प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवून गेली. खुल्या रंगमंचावर सादर झालेल्या या नाटकांनी केवळ मनोरंजनच केले नाही, तर गावकरी व पालकांपर्यंत समाजप्रबोधनाचा मजबूत संदेश



पोहोचवला.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती वसमतचे गटशिक्षणाधिकारी श्री. सतीश काष्टे, कुरुंदा बीटाच्या शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती संगीता जाधव, हु. बहिर्जी स्मारक विद्यालय वापटीचे मुख्याध्यापक श्री. बी. के. सावळे, तसेच आंबा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. रंगनाथ भोसले उपस्थित होते. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांच्या सहभागाचे महत्व अधोरेखित केले आणि शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात श्री. काष्टे यांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी सांस्कृतिक उपक्रमांची गरज अधोरेखित केली. त्यांनी गावातील प्रतिष्ठित नागरिक, माजी विद्यार्थी आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी एकत्र येऊन शाळेच्या उन्नतीसाठी हातभार लावावा, असे आवाहन केले.. क्वेस्ट (QUEST) संस्थेचे तालुका समन्वयक श्री. सचिन चिंचोलकर यांनी माहिती दिली की, गावात संध्याकाळी आयोजित केलेला हा पहिलाच “गोष्टरंग” कार्यक्रम असून, मिळालेला प्रतिसाद अत्यंत प्रेरणादायी ठरला आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री रामप्रसाद हरबळे आणि उपस्थित पालकांनी शाळेच्या विकासासाठी आपल्या परीने भरीव आर्थिक तसेच सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच सहकारी शिक्षक श्रीमती अर्चना काळबांडे, श्रीमती अर्चना कदम, श्रीमती अंजली भुसारे, श्री मारोती मगर, श्रीमती पुष्पा भगवत, श्री आदेश देशपांडे,श्री पद्मसिंह जाधव,श्री राजेंद्र साबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय:

### निवडणुकीच्या तोंडावर 'विकास' आठवणारे

### स्थानिक स्वराज्यनिवडणुकीचा 'विकास' आणि नागरिकांची उपेक्षा

स्थानिक स्वराज्य संस्था—मग त्या ग्रामपंचायती असोत, नगरपालिका किंवा महानगरपालिका—या लोकशाहीचा आधारस्तंभ आहेत. नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याची आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात सुधारणा घडवण्याची त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. परंतु, आपल्या देशातील अनेक स्थानिक संस्थांचा कारभार पाहिल्यास, एक कटू सत्य वारंवार समोर येते: 'विकास' हा शब्द केवळ निवडणुकीच्या जवळ आल्यावरच त्यांना आठवतो.निवडणुका जवळ येतात आणि अचानक शहरांमधील रस्ते चकचकीत होऊ लागतात, अर्धवट राहिलेले पूल आणि उड्डाणपूल रात्रीतून पूर्णत्वास येऊ लागतात, गलिच्छ वस्त्यांमध्येही पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईन टाकण्याचे काम वेगाने सुरू होते. वर्षभर धूळ खात पडलेल्या प्रकल्पांवर भगवे, हिरवे, पिवळे झेंडे लावून त्यांची घाईघाईने उद्घाटने केली जातात. हा ‘निवडणुकीचा विकास’ म्हणजे नागरिकांच्या वर्षभराच्या उपेक्षेची भरपाई करण्याचा एक केविलवाणा प्रयत्न असतो. नेमकी टीका कशावर?या प्रथेवरची टीका केवळ कामाच्या वेळेवर नाही, तर त्यामागील मानसिकतेवर आहे:सतततेचा अभाव: स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार हा 'सेवा' म्हणून अपेक्षित आहे, 'उपकार' म्हणून नाही. जर एखादा विकास प्रकल्प महत्त्वाचा असेल, तर तो वर्षभर सातत्याने चालू राहिला पाहिजे. केवळ मतदारांना आकर्षित करण्यासाठी शेवटच्या क्षणी केलेली कामे ही निकृष्ट दर्जाची आणि टिकाऊपणा नसलेली असतात. दोषपूर्ण प्राधान्यक्रम वर्षभर नागरिकांना खड्डेमय रस्त्यांवरून प्रवास करावा लागतो, अनियमित पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागतो, आणि कचऱ्याचे ढिगारे सहन करावे लागतात. पण निवडणुकीच्या काळात, नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याऐवजी, भव्यदिव्य आणि दिखाऊ प्रकल्पांवर अधिक लक्ष केंद्रित केले जाते, ज्याचा तात्काळ निवडणुकीत फायदा होईल.नागरिकांचा अपमान : लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला हे चांगलेच माहीत असते की, मतदारांची स्मरणशक्ती कमी असते. शेवटच्या क्षणी केलेल्या घोषणा आणि कामांमुळे नागरिक खूश होतात आणि मतदारांना आपल्याकडे वळवता येते, या गैरसमजातून ही 'निवडणूकपूर्व विकास' मोहीम चालवली जाते. हा मतदारांचा आणि लोकशाही प्रक्रियेचा एक प्रकारे अपमानच आहे. भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापन : घाईघाईत मंजूर होणारे आणि पूर्ण होणारे प्रकल्प अनेकदा भ्रष्टाचार आणि अनियमिततेचे बळी ठरतात. निविदा प्रक्रिया योग्यरित्या पार पाडली जात नाही आणि कंत्राटदारांना जास्त दर देऊन कामे दिली जातात. यामुळे सार्वजनिक पैशाचा अपव्यय होतो.काय हवे आहे? या 'निवडणुकीच्या विकासा'च्या चक्रातून बाहेर पडण्यासाठी प्रशासकीय पारदर्शकता आणि नागरिक सहभाग हे दोन मुख्य उपाय आहेत पाच वर्षांचा विकास आराखडा: प्रत्येक स्थानिक संस्थेने निवडणुकीच्या आधीच पुढील पाच वर्षांचा, नागरिकांशी चर्चा करून, एक स्पष्ट विकास आराखडा प्रसिद्ध करावा. या आराखड्याची अंमलबजावणी वर्षभर, महिन्या-महिन्याला, सार्वजनिकरित्या तपासली जावी प्रशासकीय उत्तरदायित्व : निवडून आलेल्या प्रतिनिधींनी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केवळ निवडणुकीच्या भीतीपोटी नव्हे, तर आपल्या कर्तव्याचे भान ठेवून काम केले पाहिजे. नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घेणे, हा त्यांच्या कामाचा अविभाज्य भाग असला पाहिजे.जागरूक मतदार: सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मतदारांनी आता 'विकास' फक्त शेवटच्या तीन महिन्यांत पाहण्याऐवजी, मागील साडेचार वर्षांचा कारभार तपासावा. केवळ उद्घाटनाच्या समारंभांना आणि आश्वासनांना भुलून न जाता, 'सातत्यपूर्ण कामाला' मत देणे, हीच खरी लोकशाहीची ताकद आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांनी हे लक्षात घ्यावे की, 'विकास' ही एक न संपणारी प्रक्रिया आहे, तो केवळ निवडणुकीचे हत्यार नाही. जर त्यांनी वर्षभर प्रामाणिक आणि सातत्याने काम केले, तर निवडणुकीच्या तोंडावर 'विकास' आठवण्याची वेळ त्यांच्यावर येणारच नाही. नागरिकांनीही आता 'निवडणुकीचा विकास' नाकारून, 'सततच्या विकासा'साठी आग्रही राहणे, हेच आपल्या लोकशाहीसाठी अधिक महत्त्वाचे आहे.

# डोंबिवली मनपा निवडणुकीसाठी RPI(A) चा 'वेट अँड वॉच'; 'युती' न झाल्यास स्वबळावर लढण्याचा निर्धार!



डोंबिवली: कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (A ) ने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. समविचारी पक्षांसोबत युती करण्याची तयारी दर्शवत असतानाच, जर युती झाली नाही, तर मात्र सर्व जागांवर स्वबळावर लढण्याचा एकमुखी ठराव पक्षाने संमत केला आहे.राष्ट्रीय अध्यक्ष मा. दीपकभाऊ निकाळजे आणि महाराष्ट्र राज्य महिला आघाडीच्या अध्यक्ष सुनीता ताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. बाळासाहेब पवार साहेब यांच्या आदेशाने, रविवार, २४ डिसेंबर २०२५ रोजी डोंबिवली (पूर्व) येथील जाधव बंगलो येथे कल्याण डोंबिवली जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.या बैठकीत ठाणे जिल्हा अध्यक्ष मा. मंगेश जाधव आणि ठाणे जिल्हा सचिव मा. सचिन कोकणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाने KDMC निवडणुकीत आपली भूमिका स्पष्ट केली. युतीसाठी पक्ष सकारात्मक असून, सन्मानजनक जागा न मिळाल्यास किंवा युती न झाल्यास, पक्षाची संपूर्ण ताकद पणाला लावून सर्व जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.बैठकीचे अध्यक्षस्थान क. डो. जिल्हा युवक अध्यक्ष योगेश गायकवाड यांनी भूषवले, तर सूत्रसंचालन क. डो. जिल्हा युवक महासचिव दीपक भालेराव यांनी केले. यावेळी अमित गायकवाड, अनवर हुसेन शेख, सुमित कुनकुटे, नेमीचंद वाघमारे, प्रवीण गायकवाड, प्रविन वाघमारे, प्रतिक थोरात यांच्यासह कल्याण आणि टिटवाळा शहर तसेच विविध वॉर्डांमधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.'युती'चा प्रस्ताव; नाहीतर स्वबळावर सत्ता! डोंबिवली मनपा निवडणुकीसाठी RPI(A) ची जोरदार तयारीकल्याण-डोंबिवली: आगामी कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (A) पूर्ण ताकदीने उतरण्याच्या तयारीत आहे. पक्षाने समविचारी पक्षांसोबत युतीचा मार्ग खुला ठेवला असला तरी, जर युती झाली नाही, तर स्वबळावर निवडणूक लढण्याचा आक्रमक आणि एकमुखी ठराव नुकत्याच झालेल्या बैठकीत संमत करण्यात आला.राष्ट्रीय अध्यक्ष मा. दीपकभाऊ निकाळजे आणि प्रदेश नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली, रविवार, २४ डिसेंबर २०२५ रोजी डोंबिवली (पूर्व) येथील जाधव बंगलो येथे कल्याण-डोंबिवली जिल्हा पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली.यावेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष मा. मंगेश जाधव आणि मा. सचिन कोकणे यांनी निवडणुकीच्या तयारी संदर्भात मार्गदर्शन केले. पक्षाची भूमिका स्पष्ट करताना, युतीसाठी शेवटपर्यंत प्रयत्न केले जातील, मात्र, कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करत स्वबळावर लढण्यासाठीही सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले.या बैठकीला क. डो. जिल्हा युवक अध्यक्ष योगेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली अनेक प्रमुख पदाधिकारी, युवक कार्यकर्ते आणि विविध विभागांतील प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीचे यशस्वी सूत्रसंचालन दिपक भालेराव यांनी केले. या बैठकीमुळे K D M C निवडणुकीच्या राजकारणात RPI(A) ची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## देगलूर तालुक्यात ‘आमचा गाव आमचा विकास’ आराखड्यासाठी कार्यशाळा संपन्न



देगलूर प्रतिनिधी: गौतम वाघमारेराष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शनदेगलूर: राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान (R G S A ) अंतर्गत, 'आमचा गाव, आमचा विकास' (GPDP) आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देगलूर तालुका स्तरावर सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसाठी नुकतीच एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत गाव विकास आराखडा तयार करण्याच्या पद्धती आणि जनजागृती यावर सविस्तर माहिती देण्यात आली मान्यवरांचे मार्गदर्शन या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी माननीय गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे हे होते. त्यांच्यासह सहाय्यक गट विकास अधिकारी श्री दत्तात्रय कुरुंदे, गट शिक्षण अधिकारी मा.सूरेवाड, बालाजी गोडाजी, पशुधन विकास अधिकारी पाशमवार साहेब, डॉ. गवाले, आणि शेख मोसिन यांच्यासह इतर मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'आमचा गाव, आमचा विकास' हा आराखडा गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागातून कसा यशस्वी करायचा, यावर भर दिला इतर मान्यवरांनी आपापल्या विभागांशी संबंधित योजना आणि त्या विकास आराखड्यात समाविष्ट करण्याचे महत्त्व समजावून सांगितले. यामध्ये शिक्षण, आरोग्य आणि पशुधन विकासासारख्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन करण्यात आले. आराखड्याचे महत्त्व आणि जनजागृती कार्यशाळेत मुख्यत्वे ग्राम पंचायत विकास आराखडा (G P D P ) तयार करण्याच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करण्यात आले. गावपातळीवर आवश्यक असलेल्या कामांची निवड, निधीचे योग्य नियोजन आणि ग्रामसभेच्या माध्यमातून या आराखड्याला अंतिम रूप देणे, याबद्दल तांत्रिक आणि प्रशासकीय माहिती देण्यात आली.ग्रामविकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि गावातील प्रत्येक नागरिकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी जनजागृतीचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.या कार्यशाळेस वन्नाळी येथील ग्रामसेवक डी.एन. कोडगिरे, खानापूर सरपंच प्रतिनिधी आणि इतर ग्रामपंचायतींचे अधिकारी, तसेच सरपंच प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रतिनिधी गौतम वाघमारे यांच्यासह सर्व उपस्थितांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेत, आपापल्या गावात 'आमचा गाव, आमचा विकास' आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त केला. ही कार्यशाळा देगलूर तालुक्यातील ग्रामविकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरली.

# रस्त्यावरील अतिक्रमणामुळे 'मानव विकास' बस सेवा ठप्प; विद्यार्थिनींचा लोकप्रतिनिधींसह पोलीस चौकीला निवेदन

(नागेश पावडे प्रतिनिधी ग्रामीण) जवळा बाजार (ता. औंढा नागनाथ) परिसरातील नालेगाव, टाकळगव्हाण आणि पोटा येथील विद्यार्थिनींसाठी आजपासून सुरू झालेली 'मानव विकास अंतर्गत' शाळेची बस सेवा रस्त्यावरील अतिक्रमणामुळे पहिल्याच दिवशी बंद पडली. बससेवा सुरू होऊनही रस्त्याच्या अडथळ्यामुळे ती बंद झाल्याने संतप्त झालेल्या विद्यार्थिनींनी लोकप्रतिनिधींसह जवळा बाजार पोलीस चौकीत धाव घेत, रस्त्यावरील अतिक्रमण तातडीने हटवण्याची मागणी केली. बस सेवा सुरू, पण रस्ता बंदशासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मानव विकास' योजनेअंतर्गत जवळा बाजार येथील इंदिरा गांधी कन्या शाळेत येणाऱ्या नालेगाव, टाकळगव्हाण आणि पोटा या गावातील



विद्यार्थिनींसाठी आजपासून बससेवा सुरू करण्यात आली होती. यामुळे विद्यार्थिनी आणि पालकांना दिलासा मिळाला होता. मात्र, जवळा-नालेगाव-टाकळगव्हाण-पोटा या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, तसेच रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या अतिक्रमणामुळे बसला पुढे जाणे शक्य झाले नाही आणि पहिल्याच दिवशी बस सेवा बंद करण्याची नामुष्की प्रशासनावर आली. लोकप्रतिनिधी, नागरिक आणि विद्यार्थिनींची मागणीबस सेवा सुरू होऊनही रस्त्यामुळे बंद पडल्याने विद्यार्थिनींमध्ये नाराजी पसरली. या गंभीर प्रश्नाची दखल घेत, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक विद्यार्थिनींच्या बाजूने उभे राहिले.यावेळी तालुका प्रमुख संतोष शेळके, पंचायत समिती सदस्य संजय नागरे, सरपंच मुंजाजी पावडे, असोला येथील उपसरपंच राणोजी आव्हाड, बाळु पाटील पोटेकर, संजय कदम यांच्यासह इंदिरा गांधी कन्या शाळेतील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.उपस्थित सर्वांनी एकत्रितपणे जवळा बाजार येथील पोलीस चौकीत निवेदन सादर केले. जवळा बाजार ते नालेगाव-टाकळगव्हाण-पोटा या रस्त्यावरील झालेले अतिक्रमण तातडीने हटवावे आणि बस सेवा पुन्हा सुरळीत चालू करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, जेणेकरून विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी अपेक्षा परिसरातील पालकांनी व्यक्त केली आहे.

# वसमत नगरपरिषद निवडणूक निमित्ताने माजी मंत्री'दांडेगावकर' यांची वॉर्ड 06 मध्ये नागरिकाच्या भेटीगाठी आणि संवाद

वसमत नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर, महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ, माजी मंत्री आदरणीय जयप्रकाश दांडेगावकर यांनी वॉर्ड क्रमांक ०६ मध्ये नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन जोरदार संवाद साधला. यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या, अडचणी आणि त्यांच्या मूलभूत अपेक्षा लक्षपूर्वक जाणून घेतल्या.नागरिकांच्या समस्यांचे थेट आकलन प्रचारादरम्यान माजी मंत्री दांडेगावकर यांनी प्रभागातील रस्ते, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, शिक्षण आणि सार्वजनिक सुरक्षितता यांसारख्या मूलभूत सुविधांची सद्यस्थिती आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांची माहिती घेतली. नागरिकांनीही आपल्या अडचणी त्यांच्यासमोर मोकळेपणाने मांडल्या.सर्वांगीण विकासासाठी मतदानाचे आवाहन यावेळी



बोलताना, दांडेगावकर यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार नागरिकांना विश्वास दिला की, निवडून आल्यास वॉर्ड क्रमांक ०६ च्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. प्रभागातील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध आहे.नागरिकांना आवाहन करताना ते म्हणाले की, "वॉर्डाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करून नगरपरिषदेत पाठवावे."या महत्त्वाच्या प्रचारदौऱ्यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, वॉर्ड ०६ मध्ये महाविकास आघाडीचे पारडे जड असल्याचे चित्रि दसत आहे.

# हिंगोली येथील लोकअदालतीमध्ये

## 8 कोटी 52 लाखांहून अधिक रकमेची प्रकरणे निकाली




हिंगोली , दि. १४ : येथील तालुका विधी सेवा समितीच्या वतीने सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय मुंबई तसेच जिल्हा न्यायालय व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली न्यायालय परिसरात नुकतेच राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.या लोकअदालतीत प्रलंबित असलेली एकूण १५५१ प्रकरणे तसेच विद्युत महावितरण कंपनी, विविध बँका, ग्रामपंचायत व नगरपालिका यांची वाद दाखलपूर्व ११ हजार १५९ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. यापैकी लोकअदालतीमध्ये प्रलंबित २७१ प्रकरणे व वाद दाखलपूर्व १३३ प्रकरणे निकाली काढण्यात आली.या लोकअदालतीत प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणांमध्ये ८ कोटी ५२ लाख ९३ हजार ५०३ रुपयांची तडजोडीच्या आधारे रक्कम निश्चित करून प्रकरणे यशस्वीरीत्या निकाली काढण्यात आली. या लोकअदालतीसाठी हिंगोली येथील न्यायिक अधिकारी व विधिज्ञांचा समावेश असलेले पाच पॅनल गठित करण्यात आले होते.ही लोकअदालत मार्गदर्शन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष टी. एस. अकाली यांच्या मार्गदर्शनाखाली पॅनल प्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश-१ व्ही. एस. माने, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ आर. एस. रोटे, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) व्ही. एम. मानखैर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती पी. आर. पमनानी व तिसरे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती एस. एस. पळसुळे यांनी काम पाहिले.* दिव्यांग महिला पक्षकाराची बाजू समजून घेण्यासाठी न्यायाधीश उतरले पॅनलवरुन खालीया लोकअदालतीत मानवी संवेदनशीलतेचा आदर्श ठरलेला प्रसंग घडला. श्रीमती उषाबाई परमेश्वर कोराडे या दिव्यांग महिला पक्षकाराला चालता येत नसल्याने त्या न्यायालयाच्या वरच्या मजल्यावर येऊ शकत नव्हत्या. ही बाब लक्षात घेऊन तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ आर. एस. रोटे यांनी स्वतः पॅनलवरून खाली उतरून न्यायालय इमारतीसमोरील आवारात उभ्या असलेल्या वाहनात जाऊन उषाबाई कोराडे यांची बाजू समजून घेतली. या प्रकरणात १९ लाख ३० हजार रुपयांच्या नुकसान भरपाईवर तडजोड होऊन प्रकरण निकाली काढण्यात आले. या प्रकरणात उषाबाई कोराडे यांची बाजू ॲड. एस. बी. गडदे यांनी मांडली.राष्ट्रीय लोकअदालतीमुळे नागरिकांना जलद, सुलभ व खर्चमुक्त न्याय मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

## काव्यस्पंदन काव्य संमेलन व सृजनसन्मान समाजरत्न, शिक्षकरत्न

# राज्यस्तरीय पुरस्कार विवीध मान्यवरांना प्रदान



वसमत :: काव्यस्पंदन काव्य संमेलन व सृजनसन्मान पुररकार आखाडा बाळापूर आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात मिलिंद आळणे, माजी सरपंच लिंबाजी आव्हाड, गुरुनाथ गाडेकर, मरीबा मोरे, ॲड गोरखनाथ आव्हाड यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार प्रा.सुदर्शन शेळके व श्रीमती शीतल पवार यांना राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार साहित्य कला सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा घेऊन यांचा आढावा घेऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला सामाजिक कार्याची व गुणवत्तेबद्दल यांच्या गुणांची कदर करून या सर्वांना काव्यस्पंदन काव्य संमेलन व सृजन सन्मान पुरस्कार 2025 तर्फे मिलिंद आळणे, मा. सरपंच लिंबाची आव्हाड, गुरुनाथ गाडेकर, मरीबा मोरे, ॲड. गोरखनाथ आव्हाड यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार प्रा. सुदर्शन शेळके व श्रीमती शीतल पवार यांना राज्यस्तरीय शिक्षकरत्न यांना पुरस्कार करण्यात आला हा पुरस्कार समाजाच्या हितासाठी निस्वार्थी पणे प्रभावशाली सामाजिक कार्याचा सन्मान आहे. सर्वजण कार्याचा गौरव म्हणून हा काव्यसंदन काव्यसंमेलन व सृजनसन्मान पुरस्कार प्रधान करण्यात येत आहे. आपणास भावी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा काव्य स्पंद ना अध्यक्षा सौ रंजना लसने, भालचंद क-हाडे प्रमुख अतिथी अजयजी बिरारी प्रसिध्द विचारवंत लेखक सहित्यीक विश्वनाथ सुर्यवंशी यांचा कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. इतर मान्यवरांच्या उपस्थिती होती.आळणे मिलिंद, मा. सरपंच लिंबाजी आव्हाड,मरीबा मोरे,सुदर्शन शेळके श्रीमती शीतल पवार,ॲड. गोरखनाथ आव्हाड,गुरुनाथ गाडेकर हे पुरस्कार मिळाल्याबद्दल नातेवाईक मित्र परिवारातून त्यांचे कौतुक केले आहे.

# सातेफळ नगरीच्या शिरपेचात मानाचा तुरा

प्रतिनिधी : सुनीता डरंगेपूर्णा तालुक्यातील सातेफळ वाघ (जि. परभणी) येथील शेतकरी कुटुंबातील कन्या साधना सटवाजी चव्हाण हिने आपल्या उत्कृष्ट कौशल्य, कठोर मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर सातेफळ नगरीचे नाव महाराष्ट्राच्या पटलावर उज्ज्वल केले आहे. आई-वडिलांचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवत तिने आपल्या अंगी असलेल्या कलेला योग्य दिशा दिली.साधना चव्हाण हिची राष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली होती. तिच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत गावकरी, कुटुंबीय व





महाविद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल पत्रकार सुनीता डरंगे यांच्या हस्ते साधनाला भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.दरम्यान, चंदीगड येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत साधना चव्हाण हिने उत्कृष्ट कामगिरी केली असून संघाने विजेतेपद पटकावले. साधनासह संघातील सर्व खेळाडूंना मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.या यशामुळे सातेफळ नगरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून परिसरातून साधनावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## सुनिता नामदेव डरंगे माजी विद्यार्थी गुणगौरव व सत्कार सोहळा समारंभ संपन्न



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरा मोत्या ता. पूर्णा जि. परभणी शाळेतील माजी विद्यार्थींनी कवी. पत्रकार. कू. सुनिता नामदेव डरंगे यांचा त्यांच्या साहित्य क्षेत्रातील कार्याला मिळालेला २०२५चा राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार प्रदान व पत्रकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या उल्लेखनीय कार्याची प्रेरणा घेत . शाळेच्या वतीने त्यांचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ गुडप्पा सर यांच्या हस्ते शाल हार श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. सत्कारमूर्ती. सुनिता डरंगे यांनी त्यांच्या भाषणातून जिल्हा परिषद शाळा म्हणजे मंदिर व तिथले शिक्षक जणू यशस्वी जीवनाचा मूलभूत पाया असतात असे सांगत विद्यार्थ्यांना इंटरनॅशनल स्कूल मध्ये न टाकता जिल्हा परिषद शाळेत प्रवेशित करा असे आव्हान पाल्यांना केले. या स्पर्धेत टिकायच असेल तर विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेचे शिक्षण खूप महत्वाचे आहे असे त्यांनी स्पष्ट केले. अशीच प्रगती करत आमच्या गावचे नाव देशभर उज्वल कर हा अभिमानाचा क्षण आमच्यासाठी खूप खास आहे असे सांगत शाळेतील शिक्षकांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ गुंडप्पा सर व त्यांचा पूर्ण स्टॉप आणि पालक, विद्यार्थी मित्र, उपस्थित होते.

# भाजपला मोठे बळ! महसूलमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते आकाश सोनवणे, कनैया वाढवनकर, रमेश अंभोरे, आदर्श सोळंके यांचा जाहीर प्रवेश

जवळा बाजार प्रतिनिधी: प्रमोद श्रीखंडे वसमत नगर परिषद निवडणुकीत प्रचार साठी आलेले महसूलमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या उपस्थितीत, विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात (भाजप) जाहीर प्रवेश केल्याने पक्षाला स्थानिक पातळीवर मोठे बळ मिळाले आहे. छत्रपती शिवाजीराजे मित्रमंडळाचे अध्यक्ष तथा सावता परिषदचे तालुकाध्यक्ष आकाश सोनवणे, प्रसिद्ध सोन्याचे व्यापारी कनैया वाढवनकर, रमेश अंभोरे आणि युवा उद्योजक आदर्श सोळंके यांनी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला. महसूलमंत्र्यांनी या सर्व नवसदस्यांचे पक्षात स्वागत केले. महत्त्वाच्या नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश आकाश सोनवणे हे सामाजिक आणि राजकीय वर्तुळात सक्रिय आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील छत्रपती शिवाजीराजे मित्रमंडळ आणि सावता परिषदचे तालुकाध्यक्षपद यामुळे त्यांच्या प्रवेशाने भाजपला एका मोठ्या सामाजिक गटाचे पाठबळ मिळाले आहे.तसेच, शहरातील प्रतिष्ठित सोन्याचे व्यापारी कनैया वाढवनकर




यांचा प्रवेश व्यापारी वर्गासाठी एक सकारात्मक संदेश घेऊन आला आहे. याशिवाय, रमेश अंभोरे आणि युवा उद्योजक आदर्श सोळंके यांच्यासारख्या प्रभावी व्यक्ती पक्षात आल्याने, संघटना आणि विकासकामांसाठी अधिक सक्रियता येणार असल्याची चर्चा आहे. महसूलमंत्र्यांकडून शुभेच्छाहा जाहीर पक्षप्रवेश सोहळा महसूलमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या उपस्थितीत पार पडला, जो या प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करतो. महसूलमंत्र्यांनी या नवीन सदस्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी विश्वास व्यक्त केला की, या नेत्यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक अनुभवाचा उपयोग पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी होईल. आमदार मुटकुळे यांच्यासह नेत्यांकडून अभिनंदन या महत्त्वपूर्ण पक्षप्रवेशानंतर स्थानिक नेतृत्वाने आनंद व्यक्त करत नवनियुक्त सदस्यांचे अभिनंदन केले आहे. स्थानिक आमदार तानाजीराव मुटकुळे, माजी आमदार रामराव वडकुते आणि ज्येष्ठ नेते अंकुश आहेर यांनी आकाश सोनवणे, कनैया वाढवनकर, रमेश अंभोरे आणि आदर्श सोळंके यांचे पक्षात स्वागत केले.यावेळी आमदार मुटकुळे यांनी नमूद केले की, "या प्रभावशाली नेत्यांच्या प्रवेशामुळे भाजपची ताकद आणखी वाढली आहे. आता सर्वांनी एकत्रितपणे माननीय महसूलमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्य करावे." माजी आमदार रामराव वडकुते आणि अंकुश आहेर यांनीही सर्व नवनियुक्त सदस्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रीय लोकअदालतीत जिल्ह्यात 3 हजार 612 प्रकरणे निकाली

# साडेचौदा कोटीची तडजोड




नांदेड दि. 15 डिसेंबर :- महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेडचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनिल वेदपाठक यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तळमजला येथे 13 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10.30 वा. राष्ट्रीय लोकअदालतीचा उद्धाटन समारंभ पार पडला. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे, बारअसोसिएशन ॲड आशिष गोधमगावकर, जिल्हा सरकारी वकील ॲड रणजित देशमुख, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव शरद देशपांडे तसेच नांदेड येथील सर्व न्यायाधीश उपस्थित होते.प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष सुनील वेदपाठक यांच्या हस्ते उत्कृष्ट बाल-साहित्यासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांचा सत्कार करतांना त्यांच्या साहित्यिक कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव शरद देशपांडे यांनी तयार केलेली लोकअदालतीविषयीची चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड गजानन पिंपरखेडे यांनी कले. या लोक न्यायालयात नांदेड जिल्हयातील एकूण 13 हजार 723 प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी 911 प्रकरणे निकाली निघाली व जवळपास दहा कोटी 43 लाख रूपयाचे तडजोड मुल्य मिळाले मालमत्ता थकबाकीची, पाणीपट्टीची एकूण 29 हजार 541 प्रकरणे ठेवली होती त्यापैकी 2 हजार 701 प्रकरणे निकाली निघाली व 4 कोटी 65 लाख रूपयांचे तडजोड मुल्य आहे, असे एकूण 3 हजार 612 प्रकरणे निकाली निघाली आणि तडजोड मूल्य 14 कोटी 49 लाख 63 हजार 436 रूपये एवढे आहे, लोक न्यायालयासाठी सहभागी झालेल्या सर्व पक्षकार बांधव, न्यायाधीश वर्ग, कर्मचारी वर्ग त्या सर्वांचे आभार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव शरद देशपांडे यांनी मानले.

# युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु राहणार




परभणी, (प्रतिनिधी): मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना यापुढे देखील सुरू राहणार आणि त्यासाठी 418 कोटी रुपये निधी देण्यात आला अशी माहिती राज्याचे कौशल्य विकास आणि रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. आमदार डॉ.राहुल पाटील यांनी याबाबत लक्षवेधी उपस्थित केल्यानंतर त्यांनी हे उत्तर दिले. एक लाख 26 हजार प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नांवर आमदार पाटील यांनी विधानसभेत आक्रमक भूमिका मांडली. यावेळी आमदार पाटील आणि लोढा यांच्यात चांगलाच वादविवाद रंगला.विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. या योजनेत 11 महिन्यासाठी कौशल्य विभागामार्फत शासकीय व निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्यात आली. या प्रशिक्षणाचा कालावधी एक डिसेंबर रोजी पूर्ण झालेला असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर संबंधित आस्थापनेत कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्याची आश्वासन तत्कालीन सरकारने दिले होते.मात्र ही आश्वासन अद्याप पूर्ण करण्यात आली नसल्याने परभणी जिल्ह्यासह राज्यातील एक लाख 26 हजार प्रशिक्षण घेतलेल्या युवक युवतींवर बेरोजगारीची वेळ आल्याने आमदार डॉ.राहुल पाटील यांनी विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात अखेरच्या दिवशी सरकारला याची जाणीव करून दिली. यावेळी बोलताना आमदार डॉ.पाटील यांनी आक्रमकपणे भूमिका मानत सांगितले की या प्रशिक्षणार्थ्यांमध्ये शासनाच्याप्रती असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे ही योजना केवळ निवडणुकीपूर्ती होती का ? गरज सरो वैद्य मरो अशी भूमिका शासनाची आहे का ?अशी प्रश्नांची सरबत्ती करत आमदार पाटील यांनी या योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी नोकरी देणार का असा प्रश्न केला. त्यावर मंत्रि मंगलप्रभात लोढा यांनी उत्तर दिले,ते म्हणाले या योजनेत ज्यांनी प्रशिक्षण घेतले त्यांना पुन्हा पाच महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे ही योजना बंद झाली नसून उलट या योजनेसाठी 418 कोटी रुपये मंजूर झाले आहेत. भविष्यातही ही योजना सुरू राहील असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उत्तराने समाधानी न झाल्याने आमदार पाटील यांनी पुन्हा मंत्री लोढा यांना सभागृहात प्रश्न विचारत धारेवर धरले. अखेर मंत्री लोढा यांनी पुन्हा ही योजना सुरू राहील याची हमी दिली.

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला बालविकास विभागाने रोखला बाल विवाह

नांदेड दि. 15 डिसेंबर :- जिल्ह्यात बाल विवाहाची कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ शहरी भागातील बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच ग्रामीण भागात ग्रामसेवक, अंगणवाडी सेवीका, चाईल्ड हेल्प लाईन 1098 या टोल फ्री क्रमांक वर संपर्क साधावा. जेणे करुन भविष्यातील अनिष्ठ प्रथा रोखता येतील असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत 100 दिवस अभियान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. अर्धापुर तालुक्यात एका 17 वर्षीय बालिकेचा बालविवाह होणार असल्याबाबत गोपनीय



माहिती चाईल्ड लाईन 1098 ला प्राप्त झाली. ही तक्रार प्राप्त होताच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा बालसंरक्षण अधिकारी विद्या आळणे व चाईल्ड हेल्प लाईनचे कर्मचारी ऐश्वर्या शेवाळे, दिपाली हिंगोले यांनी पिडीत मुलीच्या घरी गृहभेट देऊन बालिकेचा आई व नातेवाईकांचे समुपदेशन केले. मुलीच्या वयाबाबत खात्री करुन बालविवाह दुष्परीणाम व बालविवाह प्रतिबंधक अधिनियम 2006 बाबत सविस्तर माहिती दिली. बालविवाह बेकायदेशीर असल्याचे मुलीच्या पालकाला समजावुन सांगण्यात आले. सदर मुलीला काळजी व संरक्षणाच्यादृष्टीने बालकल्याण समिती नांदेड यांच्या समोर हजर करण्यात आले. यावेळी पालकांकडून बालविवाह न करण्याबाबत हमीपत्र घेण्यात आले असुन सदरील बालविवाह रोखण्यात आला आहे.

# कुडाळा सरपंच निष्कासन आदेशाला उच्च न्यायालयाची स्थगिती!






भुजंगराव चव्हाण यांना सरपंच आणि सदस्य पदावरून निष्कासित करण्याच्या दि. १० डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी अंतरिम स्थगिती दिली आहे. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांची ही अपात्रतेची कारवाई नियमबाह्य (Irregular) असल्याचे आपल्या आदेशात नमूद केले आहे.जिल्हाधिकारींच्या आदेशाला दोनच दिवसांत स्थगितीसौ. रसवंता चव्हाण या कुडाळा ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच आहेत. जिल्हाधिकारी हिंगोली यांनी नुकताच दि. १० डिसेंबर २०२५ रोजी काढला होता. मात्र, या आदेशामुळे सौ. चव्हाण यांचे पद धोक्यात आले होते.या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरुद्ध सौ. चव्हाण यांनी तातडीने मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली. त्यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक १५०५६ / २०२५ (Writ Petition No. 15056 / 2025) वर खंडपीठाने त्वरित सुनावणी घेतली. उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या सुनावणीनंतर माननीय उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिला. न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली निष्कासनाची कारवाई प्रथमदर्शनी 'नियमबाह्य' असल्याचे आपल्या आदेशात स्पष्टपणे नमूद केले आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या दि. १०.१२.२०२५ च्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली.या स्थगितीमुळे सौ. रसवंता भुजंगराव चव्हाण यांचे सरपंच आणि सदस्य पद तात्पुरते सुरक्षित राहिले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी होईपर्यंत त्या आपल्या पदावर कार्यरत राहतील.वकिलांनी यशस्वीपणे मांडली बाजू सौ. रसवंता चव्हाण यांच्या वतीने ॲड. सुधीर चव्हाण आणि ॲड. नितीन भालेराव यांनी उच्च न्यायालयात यशस्वीपणे बाजू मांडली. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली कारवाई कायदेशीर प्रक्रिया आणि नियमांनुसार नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे न्यायालयाने तातडीने स्थगितीचे आदेश दिले.या आदेशामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत सदस्य आणि पदाधिकाऱ्यांच्या अपात्रता प्रकरणात नियमांचे कठोर पालन करणे आवश्यक असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.